

# येशू
## कोण आहे?

ई. सुरेश थॉमस

WORD UNPACKED

YouTube : WORD UNPACKED

Instagram : WORD UNPACKED

LIKE SHARE SUBSCRIBE

www.whoisjesus.faith

# येशू

## कोण आहे ?



ई. सुरेश थॉमस्

# अनुक्रमणिका


परिचय : येशू कोण आहे ? .................................................. 1

अध्याय एक : त्याचा जन्म आणि पूर्व-अस्तित्व .................................. 3

अध्याय दोन : त्याचे निष्पाप जीवन .................................................. 25

अध्याय तीन : त्याची शिकवण .................................................. 37

अध्याय चार : त्याने केलेली अद्भूत कृत्ये .................................. 53

अध्याय पाच : त्याचा मृत्यू .................................................. 77

अध्याय सहा : त्याचे पुनरुत्थान .................................................. 95

अध्याय सात : त्याचे दुसरे आगमन .................................................. 109

समारोपन : माझा प्रतिसाद .................................................. 127

## परिचय

# येशू कोण आहे ?

बायबल हे ऐतिहासिक पुस्तक आहे ज्यात जगाच्या उत्पत्तीपासून ते युगांच्या समाप्तीपर्यंतच्या घटनांची नोंद करण्यात आली आहे.

बायबलचे पहिले पुस्तक म्हणजे उत्पत्ती या पुस्तकाची सुरूवात या वाक्याने होते, “प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली.” देव सनातन, सर्वसमर्थ (महा–सामर्थ्यशाली), सर्वव्यापी (सर्व वेळी सर्व स्थानी उपस्थित असणारा), आणि सर्वज्ञानी (सर्वकाही जाणणारा) आहे. त्याने आपल्या मुखातील शब्दाने सर्वकाही उत्पन्न केले.

आम्ही पुढे वाचतो की आपण आपल्या आजूबाजूला जे काही पाहतो ते देवाने कसे उत्पन्न केले. त्याने वनस्पती, रोपटी, मासे, पशु, वन्य प्राणी, आकाशातील पक्षी आणि जे काही पृथ्वीवर आहे ते सर्व उत्पन्न केले. उत्पत्तीचे पुस्तक ह्या सृष्टीचे वर्णन करते. मुख्य उत्पन्नकर्ता म्हणून देवाने मनुष्याची उत्पत्ती करण्यापूर्वी मानवजातीच्या उदरनिर्वाहाचे प्रयोजन केले. शेवटी त्याने आपल्या स्वरूपात पुरुष व स्त्री यांना निर्माण केले आणि त्यांस एदेन नांवाच्या बागेत ठेवले. त्याने त्यांस आशीर्वाद दिला व त्यांस आज्ञा दिली की फलद्रूप व्हा आणि बहुगुणित व्हा.

त्यांना बागेतील कोणतेही फळ खाण्याचे स्वातंत्र होते पण “बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ” खाण्याची त्यांस मनाई होती. त्यांस ह्या झाडाचे फळ खाण्याच्या परिणामाविषयी सावध करण्यात आले होते. त्यांस असे सांगण्यात आले होते की ज्या दिवशी त्याचे फळ ते खातील त्या दिवशी ते खास मरतील. हव्वा परीक्षेत पडली आणि सर्पाच्या रूपात प्रगट झालेल्या पतीत दूताने,

म्हणजे सैतानाने तिला ठकविलें. हव्वाने ते फळ खाल्ले व आपला पती आदाम यासही दिलें.

या आज्ञाभंगामुळे, ज्याला बायबलमध्ये "पाप" असे म्हटले आहे, जगात मृत्यू आला. देवापासून वेगळे होणे आणि शारीरिक मृत्यू हे सर्व मानवजातीवर आले. देवाचा शत्रू असलेल्या सैतानाला काही काळासाठी देवाच्या सुंदर सृष्टीचा नाश करण्याच्या योजनेत यश मिळाले. पापामुळे हे भयंकर परिणाम आले, पण देवाने एका तारणाऱ्याचे वचन दिले.

देवानें उत्पत्ती 3:15 मध्ये सर्पास सांगितलें, "तूं व स्त्री, तुझी संतति व तिची संतति यांमध्यें मी परस्पर वैर स्थापीन; ती तुझें डोकें फोडील, व तूं तिची टांच फोडिशील." मसीहा (अभिषिक्त) ह्या स्त्रीच्या पोटी जन्मास येईल व तो एके दिवशी सर्पाचे डोके फोडील. दुसऱ्या शब्दांत, तो सैतानाचा आणि मनुष्याच्या पतनाद्वारे त्यानें जें काही साध्य केलें त्याचा नाश करील.

बायबल म्हणते "देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं त्यानें आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठीं कीं, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो, त्याचा नाश होऊं नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें" (योहान 3:16). बायबल प्रगट करते कीं हा देव सनातन स्वरूपात तीन व्यक्तीत्वात अस्तित्वात आहें : देव जो पिता, देव जो पुत्र आणि देव जो पवित्र आत्मा. देवाचा पुत्र येशू हा इस्राएल देशात 2000 वर्षांपूर्वी जन्मास आला.

अनेक लोकांनी येशू ख्रिस्ताच्या अद्वितीयतेचे परीक्षण करण्याचा प्रयत्न केला आहें आणि त्याच्या जीवनावर असंख्य पुस्तकें लिहिण्यात आली आहेत. बायबल येशूविषयी अनेक दावें करते आणि त्याचे जीवन, मृत्यू, आणि पुनरूत्थान यांचे पुरावा देते. आपण या गोष्टींकडे दुर्लक्ष करू शकत नाहीं अथवा त्यांस सहज घेऊं शकत नाहीं. येशू कोण आहे आणि तो काय करतो याविषयी योग्य समज आमचे भविष्य बदलून टाकील.

ह्या अभ्यासाचा हेतू आपणास वैयक्तिकरित्या पवित्र शास्त्रात शोध करण्यास आणि निष्कर्षाप्रत पोहोचण्यास सक्षम करणे हा आहे.

आम्हांला स्वतःच सत्याचा शोध घेण्याची गरज आहे आणि सत्य आम्हांस बंधमुक्त करील.

### *अध्याय एक*

# त्याचा जन्म आणि पूर्व-अस्तित्व

ह्या ग्रहावर कित्येक अब्ज लोक जन्मास येतात आणि मरतात. कोणती गोष्ट एका व्यक्तीच्या जन्माला अद्वितीय ठरविते? व्यक्ती आपल्या जन्माची वेळ, स्थळ अथवा कुटूंब ठरवू शकते काय? जसा बायबल दावा करते, त्याप्रमाणे ह्या अध्यायात आपण येशू ख्रिस्ताच्या या शब्दांमधील ख्री चा पाय मोडलेला दिसत नाही तरी कृपया यासारख्या शब्दांसाठी दुसरा फॉन्ट वापरा. जन्म व सुरवात यांचे हे परीक्षण करणार आहोत ज्याच्या व्दारे येशू आम्हां सर्व मानवा पेक्षा कोणत्या बाबतीत वेगळा आहे हे समजेल.

**अंतर्दृष्टी :** *यशयाचे पुस्तक प्राचीन यहूदी शास्त्रांचा एक भाग आहे आणि येशूच्या जन्माच्या 700 वर्षांपूर्वी त्याचे लेखन पूर्ण करण्यात आले होते. ह्या पुस्तकात यशया संदेष्ट्याने येणाऱ्या ख्रिस्ताचा जन्म, जीवन, पुरले जाणे आणि पुनरूत्थान याविषयी भविष्य कथन केले आहे.*

## शोधून पाहा :

यशया 7:14 आणि 9:6–7 यामधून खालील वचने वाचा.

- **येणाऱ्या ख्रिस्ताचे** तसेच **बाळ** व **पुत्र** यांचा उल्लेख करणारे सर्व संदर्भ वधस्तंभाच्या ✝ चिन्हानें चिन्हांकित करा. बायबलचे वचन स्पष्टपणे चिन्हांकित केल्याने आम्हांला हळूहळू पुढे जाण्यास व मुख्य शब्दांवर लक्ष देण्यास मदत होईल.

## यशया 7:14

14 यास्तव प्रभू स्वतः तुम्हांस चिन्ह देत आहे; पाहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचें नांव इम्मानुएल (आमच्यासन्निध देव) असें ठेवील.

## यशया 9:6–7

6 कारण आम्हांसाठीं बाळ जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यांवर सत्ता राहील; त्याला अद्भुत, मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती म्हणतील.

7 त्याच्या सत्तावृद्धीला व शांतीला अंत नसणार; तो दावीदाच्या सिंहासनावर बसून त्याचें साम्राज्य चालवील आणि तेथून पुढें तें सर्वकाळ न्यायानें व धर्मानें दृढ व स्थिर करील. सेनाधीश परमेश्वराचा आवेश हें सिद्धीस नेईल.

पुन्हा एकदा यशया 9:6–7 वाचा आणि यावेळी...

- **सत्ता, सिंहासन, साम्राज्य** या शब्दांना आणि त्यांच्या सर्वनामांना मुकुटाच्या चिन्हाने चिन्हांकित करा.
- **सनातन, अंत नसणार** यांसारख्या प्रत्येक समयसुचक संदर्भावर असे वर्तुळ काढा.

**स्वतः मनन करा किंवा गटात चर्चा करा आणि मग खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

- कुमारिकेच्या पोटी जन्मास येणाऱ्या पुत्रास कोणती नांव व शीर्षके देण्यात आली आहेत?

- यशया 9 मध्ये त्याच्या सत्तेची व राज्याची वैशिष्ट्यांचे वर्णन करण्यासाठी कोणत्या शब्दांचा उपयोग करण्यात आला आहे?

- हे कसे यशस्वीरित्या पूर्ण केलें जाईल? (यशया 9:7 वाचा.)



## शोधून पाहा :

देवानें येशूचा पूर्वज, राजा दावीद यास अभिवचन दिले होते की त्याचे राज्य सर्वकाळ असेल व त्याचा कधीही अंत होणार नाहीं (2 शमुवेल 7:12–17).

यशयाच्या पुस्तकात आपण जे वाचले त्यानुसार कुमारिकेच्या पोटी जन्मलेला मसीहा दाविदाच्या राज्यावर सर्वकाळ राज्य करील.

आता आपण ही भविष्यवाणी पूर्ण झाल्याविषयी वाचणार आहोत. येशूचा जन्म मरीया नांवाच्या कुमारिकेच्या द्वारे झाला. नव्या करारातील चार शुभवर्तमानांच्या लेखकांपैकी एक म्हणजे लूक, ह्यानें या घटनेची नोंद केली आहे.

आपण लूक 1:26–35, 2:1–11 वाचू.

- **येशू, पुत्र,** तसेच **पवित्र, देवाचा पुत्र, प्रथमपुत्र, तारणारा** आणि **ख्रिस्त प्रभु** यांचा समावेश असलेले सर्व संदर्भ वधस्तंभाच्या चिन्हाने चिन्हांकित करा. ✝

## लूक 1:26–35

26 नंतर सहाव्या महिन्यांत देवानें गालीलांतील नासरेथ नांवाच्या गांवीं एका कुमारीकडे गब्रीएल देवदूताला पाठविलें.

27 ती दावीदाच्या घराण्यांतील योसेफ नांवाच्या पुरुषाला वाग्दत्त होती; आणि त्या कुमारीचें नांव मरीया होतें.

28 देवदूत तिच्याकडे आंत येऊन म्हणाला, हे कृपा पावलेल्या स्त्रिये, कल्याण असो; प्रभू तुझ्याबरोबर असो.

29 ह्या बोलण्यानें तिच्या मनांत खळबळ उडाली आणि हें अभिवादन काय असेल ह्याचा ती विचार करूं लागली.

30 देवदूतानें तिला म्हटलें, मरीये, भिऊं नको, कारण देवाची कृपा तुझ्यावर झाली आहे.

31 पाहा, तूं गरोदर राहशील व तुला पुत्र होईल. त्याचें नांव येशू ठेव.

32 तो थोर होईल व त्याला परात्पराचा पुत्र म्हणतील; आणि प्रभू देव त्याला त्याचा पूर्वज दावीद ह्याचें राजासन देईल;

33 आणि तो याकोबाच्या घराण्यावर 'युगानुयुग राज्य करील,' व त्याच्या राज्याचा अंत होणार नाहीं.

34 मरीयेनें देवदूताला म्हटलें, हें कसें होईल? कारण मला पुरुष ठाऊक नाहीं.

35 देवदूतानें उत्तर दिलें, पवित्र आत्मा तुझ्यावर येईल आणि परात्पराचें सामर्थ्य तुझ्यावर छाया करील; ह्या कारणानें ज्याचा जन्म होईल, त्याला पवित्र, देवाचा पुत्र, असें म्हणतील.

## लूक 2:1-11

1 त्या दिवसांत असें झालें कीं, सर्व जगाची नांवनिशी लिहिली जावी अशी कैसर औगुस्त ह्याची आज्ञा झाली.

2 क्विरीनिय हा सूरियाचा सुभेदार असतांना ही पहिली नांवनिशी झाली.

3 तेव्हां सर्व लोक आपआपल्या गांवीं नांवनिशी लिहून द्यावयास गेले.

4 योसेफ हा दावीदाच्या घराण्यांतला व कुळांतला असल्यामुळें तोहि गालीलांतील नासरेथ गांवाहून वर यहूदीयांतील दावीदाच्या बेथलेहेम गांवी गेला,

5 व नांवनिशी लिहून देण्यासाठीं, त्याला वाग्दत्त झालेली मरीया गरोदर असतांना तिलाहि त्यानें बरोबर नेलें.

6 ते तेथें असतांना असें झालें कीं, तिचे दिवस पूर्ण भरले;

7 आणि तिला तिचा प्रथमपुत्र झाला; त्याला तिनें बाळंत्यानें गुंडाळून गव्हाणींत ठेविलें, कारण त्यांना उतारशाळेंत जागा नव्हती.

8 त्याच परिसरांत मेंढपाळ रानांत राहून रात्रीच्या वेळीं आपले कळप राखीत होते.

9 तेव्हां प्रभूचा दूत त्यांच्याजवळ उभा राहिला, प्रभूचे तेज त्यांच्याभोवतीं प्रकाशलें
आणि त्यांना मोठी भीति वाटली.

10 तेव्हां देवदूत त्यांना म्हणाला, भिऊ नका, कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व
लोकांस होणार आहे, त्याची सुवार्ता मी तुम्हांस सांगतो;

11 ती ही कीं, तुमच्यासाठीं आज दावीदाच्या गांवांत तारणारा जन्मला आहे; तो
ख्रिस्त प्रभु आहे.

**पुन्हा लूक 1:26-35, 2:1-11 वाचा आणि यावेळी...**

- **राजासन, राज्य करील,** आणि **राज्य** या शब्दांना मुकुटाच्या चिन्हाने चिन्हांकित करा.
- **युगानुयुग** आणि **अंत होणार नाहीं** यासारख्या प्रत्येक समयसुचक संदर्भावर वर्तुळ करा.

**स्वतः मनन करा किंवा गटात चर्चा करा आणि मग खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

- येशू या शब्दाला चिन्हांकित करण्याद्वारे व त्याचे निरीक्षण करण्याद्वारे आपण काय शिकता?

- त्याच्या राज्याच्या व्याप्तीविषयी आपण काय शिकता? समयाचा उल्लेख करणाऱ्या सर्व संदर्भांचे बारकाईने निरीक्षण करा.

- लूक 1:34 च्यानुसार मरीयेला कोणत्या गोष्टीची काळजी होती? तिच्या ह्या चिंतेस देवदूताने कसे उत्तर दिले?

- आमच्या (मनुष्याच्या) तुलनेत येशू कसा अद्वितीय आहे?

- यशया 7:14 आणि 9:6,7 च्या भविष्यवाणीच्या परिपूर्णतेकडे लक्ष द्या जे आपण मागील भागात वाचले आहे. काय पूर्ण झाले आहे आणि काय बाकी आहे?



शास्त्र ह्या मसीहाविषयी काय म्हणते हे पाहण्यासाठी आपण पुढे वाचूया.

## शोधून पाहा :

वाचा योहान 1:1–3, 14–17 आणि कलस्सै. 1:13–17 आणि...

- **येशू** आणि तसेच **शब्द एकुलता एक** आणि **पुत्र** यांचा समावेश असलेले सर्व संदर्भ वधस्तंभाच्या चिन्हाने चिन्हांकित करा. ✝
- **प्रारंभी, मागून, ज्येष्ठ** आणि **पूर्वी** यासारख्या समयाचा उल्लेख करणाऱ्या प्रत्येक समयसुचक संदर्भावर वर्तुळ करा.

## योहान 1:1–3; 14–17

**1** प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता.

2 तोच प्रारंभीं देवासह होता.

3 सर्व कांहीं त्याच्याद्वारें झालें आणि जें कांहीं झालें तें त्याच्यावांचून झालें नाहीं.

**14** शब्द देही झाला, आणि त्यानें आम्हांमध्यें वस्ती केली, आणि आम्हीं त्याचें गौरव पाहिलें. तें पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचें गौरव असावें असें अनुग्रह व सत्य ह्यांनीं परिपूर्ण होतें.

15 त्याच्याविषयीं योहान साक्ष देतो आणि मोठ्यानें म्हणतो : 'जो माझ्यामागून येतो तो माझ्यापुढें झाला आहे, कारण तो माझ्यापूर्वी होता,' असें ज्याच्याविषयीं मीं सांगितलें तो हाच आहे.

16 त्याच्या पूर्णतेंतून आपणां सर्वांना कृपेवर कृपा मिळाली आहे.

17 कारण नियमशास्त्र मोशेच्या द्वारें देण्यांत आलें होतें; कृपा व सत्य हीं येशू ख्रिस्ताच्या द्वारें आलीं.

**कलस्सैकरांस 1:13-17**

13 त्यानें आपल्याला अंधाराच्या सत्तेंतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यांत आणून ठेवलें.

14 त्या पुत्राच्या ठायीं, खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ति म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे.

**15** तो अदृश्य देवाचें प्रतिरूप आहे; तो सर्व उत्पत्तींत ज्येष्ठ आहे;

16 कारण आकाशांत व पृथ्वीवर असलेलें, दृश्य व अदृश्य असलेलें, राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले, जें कांहीं आहे तें सर्व त्याच्यामध्यें निर्माण झालें; सर्व कांहीं त्याच्याद्वारें व त्याच्यासाठीं निर्माण झालें आहे;

17 तो सर्वांच्या पूर्वींचा आहे व त्याच्यामध्यें सर्व कांहीं अस्तित्वांत आहे.

**स्वतः मनन करा किंवा गटात चर्चा करा आणि मग खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

- येशूच्या संदर्भांस चिन्हांकित करून तुम्हीं काय शिकता?

- योहान 1:3 च्यानुसार सर्व वस्तूंचा उत्पन्नकर्ता कोण आहे?

- आपण योहान 1:14 मध्ये वाचतो की शब्द देही झाला आणि त्याने आम्हांमध्ये वस्ती केली. हे वचन कोणाचा उल्लेख करते?

- अदृश्य देवाचे प्रतिरूप कोण आहे?

- आकाश आणि पृथ्वीवरील वस्तू कशा आणि का निर्माण करण्यात आल्या?

- कलस्सै 1:17 नुसार कोणामध्ये सर्व काही अस्तित्वात आहे?

**अंतर्दृष्टी :** *"प्रथम जन्मलेला" आणि "प्रथम उत्पन्न केलेला" समतुल्य नाहींत. जरी येशूठायी मानव स्वभाव होता, तरी त्याचा दैवी स्वभाव कधीही घडविण्यात आलेला नव्हता; जसे योहान म्हणतो की तो "प्रारंभी", "देवासह", आणि "देव होता."*

त्यानंतरच्या घटनेत येशू यहूद्यांशी बोलत आहे. यहूद्यांचा पूर्वज, अब्राहाम येशूचा जन्म झाला त्यापूर्वी सुमारे दोन हजार वर्षे होता आणि मेला.

**शोधून पाहा :**

वाचा योहान 8:54–59 वाचा आणि चिन्हांकित करा...

- अब्राहामाचा प्रत्येक संदर्भ मोठ्या **"अ"** ने चिन्हांकित करा.
- **येशू** आणि त्याच्याशी संबंधित सर्व सर्वनाम वधस्तंभाच्या चिन्हाने चिन्हांकित करा. ✝

**योहान 8:54–59**

54 येशूनें उत्तर दिलें, मीं माझें स्वतःचें गौरव केलें तर तें माझें गौरव कांहींच नाहीं; माझें गौरव करणारा माझा पिता आहे; तो आमचा देव आहे असें तुम्हीं त्याच्याविषयीं म्हणतां.

55 तरी तुम्हीं त्याला ओळखलें नाहीं; मी त्याला ओळखतों; आणि मी त्याला ओळखीत नाहीं असें जर मी म्हणेन तर मी तुमच्यासारखा लबाड ठरेन; पण मी त्याला ओळखतों व त्याचें वचन पाळतों.

56 तुमचा बाप अब्राहाम माझा दिवस पाहण्यासाठीं उल्लसित झाला; तो त्यानें पाहिला व त्याला हर्ष झाला.

57 तेव्हां यहूदी त्याला म्हणाले, तुम्हांला अजून पन्नास वर्षें झालीं नाहींत आणि तुम्हीं अब्राहामाला पाहिलें आहे काय?

58 येशू त्यांना म्हणाला, मी तुम्हांला खचित खचित सांगतों, अब्राहामाचा जन्म झाला त्यापूर्वीं मी आहें.

59 ह्यावरून त्यांनीं त्याला मारण्याकरितां दगड उचलिले; परंतु येशू मंदिरांतून गुप्तपणे निघून गेला.

**अंतर्दृष्टी :** *जेव्हा देवानें जळत्या झुडूपाजवळ मोशेला स्वतःचा परिचय करून दिला तेव्हा त्याने "मी आहे" या नांवाचा उपयोग केला. मोशे जो येशू ख्रिस्तापूर्वी सुमारे 1400 वर्षे आधी होऊन गेला, देवानें त्याचा उपयोग इस्राएलास मिसर देशाच्या गुलामगिरीतून सोडविण्यासाठी केला. "मी आहे" असा स्वतःचा परिचय करून देतांना येशू स्वतःची ओळख त्या देवाबरोबर करीत होता जो जळत्या झुडूपात मोशेला प्रगट झाला होता.*

**स्वतः मनन करा किंवा गटात चर्चा करा आणि मग खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

- या वचनांमध्ये येशू कोणता दावा करीत होता? तो स्वतःविषयी काय प्रगट करीत होता?

- यहूद्यांनी येशूच्या दाव्यां विरुद्ध कसा आक्षेप घेतला?

- त्यांच्या आक्षेपाप्रत येशूने काय प्रत्युत्तर दिलें?

- तुमच्या मते वचन 59 नुसार कोणत्या गोष्टीने यहूद्यांस "त्याला मारण्याकरिता दगड" उचलण्यास प्रवृत्त केलें?



**शोधून पाहा :**

वाचा इब्री. 1:1–3, 10–12 आणि

- **येशूचे** सर्व संदर्भ, तसेच **पुत्र** आणि **प्रभू** यांचा समावेश असलेले सर्व संदर्भ वधस्तंभाच्या चिन्हाने चिन्हांकित करा. ✝
- **देव** जो पिता आणि त्याच्याशी संबंधित सर्व सर्वनामांचा समावेश असलेले संदर्भ अथवा उल्लेख यांवर त्रिकोण करा.

**इब्री 1:1–3; 10–12**

1 देव प्राचीन काळीं अंशाअंशांनीं व प्रकाराप्रकारांनीं संदेष्ट्यांच्या द्वारें आपल्या पूर्वजांशीं बोलला.

2 तो ह्या काळाच्या शेवटीं पुत्राच्या द्वारें आपल्याशीं बोलला आहे; त्यानें त्याला सर्व गोष्टींचा वारीस करून ठेविलें आणि त्याच्याद्वारें त्यानें विश्व निर्माण केलें.

3 हा त्याच्या गौरवाचें तेज, व त्याच्या तत्त्वाचें प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दानें विश्वाधार आहे, आणि पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकीं राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.'

10 आणि, "हे प्रभू, तूं प्रारंभी पृथ्वीचा पाया घातलास आणि गगनें तुझ्या हातचीं कृत्यें आहेत;

11 तीं नाहींशीं होतील; परंतु तूं निरंतर आंहेस; तीं सगळीं वस्त्रासारखीं जीर्ण होतील;

12 तूं त्यास झग्यासारखें – वस्त्रासारखें – गुंडाळशील, आणि तीं बदललीं जातील; परंतु तूं तसाच राहतोस, तुझीं वर्षे संपणार नाहींत."

**स्वतः मनन करा किंवा गटात चर्चा करा आणि मग खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

- देव प्राचीन काळी आपल्या पूर्वजांशी कसा बोलला? तो आपल्याशी आता कसा बोलतो?

- या वचनावरून आपण येशूविषयी काय शिकता?

- जेव्हा देवानें जगाची उत्पत्ती केली तेव्हा येशू कुठे होता?

- सर्व वस्तूंना आधार कोण देतो आणि कसा?

- आता येशू कुठे आहे?

- पृथ्वीचा पाया कोणी घातला आणि कोणाच्या हाताने गगने घडविण्यात आले?

- प्रभू पृथ्वी आणि गगने यांचे काय करील?



**अंतर्दृष्टी :** *“वारस” सामान्यतः असा व्यक्ती असतो ज्याला कायद्याने पूर्वाधिकाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीचा व त्याच्या दर्ज्याचा अधिकार प्राप्त होतो. तरी, देव येथे येशूला सर्व वस्तूंचा वारस नेमीत आहे या गोष्टीचा संबंध ह्या तथ्याशी आहे की देवानें सर्व काही त्याच्याद्वारे उत्पन्न केलें. हे स्पष्ट आहे की देव मरत नाहीं व त्याच्या पुत्रास वारसा सोडून जात नाहीं. ही वचनें हे देखील शिकवितात की येशू आपल्या सामर्थ्याच्या शब्दानें विश्वाधार आहे आणि पापांची शुद्धी केल्यावर तो पित्याच्या उजवीकडे बसला आहे. आपण खालील अध्यायांत येशूचे व्यक्तित्व आणि त्याचे कार्य याविषयी आणखी शिकणार आहोत.*

## शोधून पाहा :

योहान 17:1–5 वाचा आणि.....

- **येशू** आणि **पुत्र** या शब्दाचा समावेश असलेले सर्व संदर्भ वधस्तंभाच्या चिन्हाने चिन्हांकित करा. †
- △देव जो पिता आणि त्याच्याशी संबंधित सर्व सर्वनामांचा समावेश असलेले संदर्भ अथवा उल्लेख यांवर त्रिकोण करा.

## योहान 17:1-5

1 ह्या गोष्टी बोलल्यावर येशू वर आकाशाकडे दृष्टी लावून म्हणाला, “हे माझ्या बापा, वेळ आली आहे; पुत्रानें तुझें गौरव करावें म्हणून तूं आपल्या पुत्राचें गौरव कर;

2 जे तूं त्याला दिले आहेत त्या सर्वांना त्यानें सार्वकालिक जीवन द्यावें म्हणून तूं मनुष्यमात्रावर त्याला अधिकार दिला आहे.

3 सार्वकालिक जीवन हेंच आहे कीं, तूं जो एकच खरा देव त्या तुला, व ज्याला तूं पाठविलें त्या येशू ख्रिस्ताला त्यांनीं ओळखावें.

4 जें काम तूं मला करावयास दिलें तें पुरें करून मीं पृथ्वीवर तुझें गौरव केलें आहे.

5 तर आतां हे माझ्या बापा, जग होण्यापूर्वी जें माझें गौरव तुझ्याजवळ होतें त्याच्यायोगें तूं आपणाजवळ माझें गौरव कर."

**स्वतः मनन करा किंवा गटात चर्चा करा आणि मग खाली आपली उत्तरे लिहा :**

- या वचनांतून आपण येशूविषयी काय शिकता?

- देवपित्याविषयी आपण काय शिकता?

- दुसऱ्या वचनात आपल्याजवळ काय असल्याचे येशूने म्हटले, ते त्याला कोणी दिले आणि त्याचे तो काय करील?

- तिसऱ्या वचनात सार्वकालिक जीवन काय "आहे" असे येशूने म्हटले?

- 5व्या वचनात येशूने स्वतःविषयी काय दावा केला? आपण येशूविषयी पूर्वी जे शिकलो त्याच्याशी याचे कसे सामंजस्य जुळते हे आपणांस दिसते काय?

## आपण सारांश मांडू

ह्या प्रकरणात आपण पाहिले की येशू हा देवाचा पुत्र आहे आणि त्याला "इम्मानुएल" (आम्हांबरोबर देव) म्हटले आहे. आम्ही पाहिले की भविष्याची सत्ता येशूच्या खांद्यावर असेल. त्याचे नांव "अद्भुत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपति" असेल. येशूच्या सत्तावृद्धीला आणि शांतीला अंत नसेल. त्याचे राज्य न्यायत्वाचे व नीतिमत्वाचे असेल. तो पृथ्वीवर सर्वकाळ राज्य करील. आपण हे देखील पाहिले की प्रारंभी जो शब्द देही झाला तो देवासोबत होता आणि सर्व काही त्याच्याद्वारे उत्पन्न झालें. "सर्व वस्तू" सृष्ट वस्तूंचा उल्लेख करते. तो गौरवी आहे आणि कृपा व सत्य यांनी परीपूर्ण आहे.

येशू हा अदृश्य परमेश्वराचे प्रतिरूप आहे आणि देवाच्या सर्व सृष्टीत श्रेष्ठ आहे. स्वर्ग आणि पृथ्वीवरील सर्व वस्तू, दृश्य आणि अदृश्य सर्व काही येशूद्वारे आणि येशूसाठी उत्पन्न झाले. तो सर्व वस्तूंच्या आधी आहे आणि त्याच्यामध्ये सर्व काही अस्तित्वात आहे. येशूने आकाश आणि पृथ्वीचा पाया घातला. विश्वातील लक्षावधी तारे आणि आकाशगंगा त्याच्या हाताच्या कृती आहेत आणि एक दिवश असा येईल जेव्हां तो त्यांस गुंडाळून टाकील. आपण याविषयी आणखी विशेषकरून **त्याचे दुसरे आगमन** शिर्षक असलेल्या शेवटच्या अध्यायात वाचू.

WORD UNPACKED